# महाराष्ट्र शासन

## उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग

**विकास सेंटर, ७०२, सातवा मजला, सी. गीडवाणी मार्ग, बसंत सिनेमा जवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई- ७१**
फोन क्र. – २५२०८१८२, २५२०६१९९
ईमेल – didicmumbai@gmail.com

जा.क्र. उससं/मुंप्रावि/स्थालोरो/अपिल/२०१९/

दिनांक -

प्रति

**विषय – मुंबई प्राधिकरण विभागामधील माहिती तंत्रज्ञान उद्योग घटक/ उत्पादन घटक/ सेवा उद्योग घटकांमध्ये स्थानिक लोकांना रोजगार**
**रोजगार मेळावा- दिनांक १८.०७.२०१९**

औद्योगिक विकासाद्वारे राज्यातील स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असलेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये व स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांकडे असलेले कौशल्य याचा योग्य तो ताळमेळ करुन स्थानिक व इतरत्र स्तरावर औद्योगिक आस्थापनांमध्ये रोजगार उपलब्ध होण्यासाठी जिल्हास्तरावरील /औद्योगिक क्षेत्रनिहाय रोजगार मेळावे आयोजित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातुन मुंबई उपनगर मध्ये रोजगार मेळावा **दिनांक १८.०७.२०१९ रोजी कुकरेजा इंफो पार्क, अणुशक्ती नगर, गोवंडी (पुर्व), चेंबुर मुंबई** येथे आयोजित करण्यात आला आहे.

तरी आपल्या उद्योग घटकाच्या आस्थापनेवर आवश्यक असणा-या मनुष्यबळाची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र “अ” मध्ये या कार्यालयास उलट टपाली सादर करावी व आपण सदर मेळाव्यामध्ये सहभागी होण्याच्या दृष्टिने आपली संमती कळवावी जेणेकरुन आवश्यक मनुष्यबळ आवश्यक असणा-या उद्योग घटकांना सदरहु मेळाव्यात सहभागी होणे सोईचे होईल.

उपरोक्त नमुद विषयांबाबत प्राप्त अहवाल शासनास सादर करणे क्रमप्राप्त असल्यामुळे माहिती त्वरीत देण्यात यावी ही विनंती.

सोबत – वरीलप्रमाणे प्रपत्र “अ”

**उद्योग सह संचालक**
**मुंबई प्राधिकरण विभाग**